09 JUN 2022
लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थिनींकडून मोडी-उर्दूतील शिवचरित्राचे भित्तिपत्रक

## सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाचा उपक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी शिवराज्याभिषेक दिनानिमित मोडी लिपी आणि उर्दू भाषेत शिवचरित्र लिहून ते भित्तिपत्रकाच्या माध्यमातून मांडले आहे. अशा पध्दतीने मोडी आणि उर्दू भाषेत भित्तिपत्रिका करणारे गरवारे महाविद्यालय राज्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.



गरवारे कन्या महाविद्यालयात विद्यार्थिनींनी उर्दू व मोडी लिपीमध्ये शिवचरित्र भितिपत्रकाद्वारे प्रदर्शित केले.

गरवारे कन्या महाविद्यालयात मात्र, इतिहास विभागाच्या वतीने मोडी लिपीतील भित्तिपत्रिका करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. दरवर्षी महाविद्यालयात शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांचा जीवनपट मोडी लिपीतील भित्तिपत्रिकेच्या माध्यमातून उलगडून दाखविण्यात येतो. प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागाच्या प्रा. डॉ. ऊर्मिला क्षीरसागर, मोडीशिक्षक मानसिंगराव कुमठेकर हे या उपक्रमाचे संयोजन करतात

यंदा राज्याभिषेक दिनानिमित्त मोडी आणि उर्दू लिपीतून भित्तिपत्रक करण्याचा संकल्प विद्यार्थिनींनी केला.

विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंची माहिती सांगणारे ३० हून अधिक लेख मोडी लिपी आणि उर्दूमधून लिहिले आहेत. शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण, आरमार, त्यांचे भाषाविषयक धोरण अशा विविध विषयावर मोडी आणि उर्दूमध्ये लेख लिहून ते आकर्षकरीत्या मांडण्यात आले आहेत.

इतिहासाच्या विद्यार्थिनी जिया बारगीर, अलबिया पीरजादे, नमेरा कुरणे यांनी उर्दूमध्ये तर, वेदश्री जोशी, जान्हवी तानवडे, काजल पांढरे, प्रणाली कांबळे, हर्षदा पुजारी, स्नेहल कांबळे, वैष्णवी संकपाळ, धनश्री आंबले, आर्या खेडेकर, मुस्कान मुजावर, प्रणाली रेडेकर, गिरिजा फडणीस, दिया पाटील, अंजली चोथे, राधिका कांबळे, निलम इंगळे, प्रियांका म्हारगुडे, श्रेया देशमुख, सोनाली पाटील, सानिका कांबळे, डॉ. वैशाली कुलकर्णी, वैष्णवी पिसे या विद्यार्थिनींनी मोडी लिपीतील लेख लिहिले आहेत.

या अभिनव भित्तिपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर.जी. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. नंदिनी काळे, डॉ. ऊर्मिला क्षीरसागर उपस्थित होते. याप्रसंगी मोडी लिपीतील अक्षरांची रांगोळीही रेखाटण्यात आली होती.

09 JUN 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. धनंजय सुतार , डॉ. सचिन पाटील यांचा सत्कार



कोल्हापूर : डॉ. धनंजय सुतार , डॉ. सचिन पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना अधिकारी व कर्मचारी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. धनंजय सुतार यांची तर ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागप्रमुखपदी डॉ. सचिन पाटील यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे ज्ञानस्रोत केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

डॉ. धनंजय सुतार यांनी १४ वर्षे महाविद्यालयीन ग्रंथपाल, २ वर्षे सहाय्यक



ग्रंथपाल, ७ वर्षे उप-ग्रंथपाल काम केले आहे. त्याचप्रमाणे त्यांना २२ वर्षांहून अधिक काळ अध्यापनाचा अनुभव आहे. दर्जेदार संशोधन, लेखक व विद्यार्थीप्रिय उप-ग्रंथपाल असा त्यांचा लौकिक आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पाटील यांची संशोधन वृत्ती, विद्याव्यासंग आणि अध्यापन कुशलतेमुळे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. दोघांना ग्रंथ देऊन स्वागत केले. ग्रंथालय व अधिविभागाच्या विकासाकरिता तसेच विद्यार्थीभिमुख कारभार यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन दोन्ही पदाधिकाऱ्यांनी केले.

अध्यक्षस्थानी डॉ. युवराज जाधव होते. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी परिचय करून दिला. सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी आभार मानले.